(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

[१९९७] १ एस.सी.आर. ३७१

श्री.संतोष कुमार वर्मा आणि इतर

— विरुद्ध —

सचिव, नगर विकास विभाग, बिहार राज्य शासन,
नवीन सचिवालय पटना, तर्फे बिहार राज्य.

१७ जानेवारी १९९७

[न्यायमूर्ति के. रामास्वामी आणि न्यायमूर्ति एस. साघिर अहमद]

सेवा कायदाः

बिहार प्रादेशिक विकास प्राधिकरण कायदा, १९८१.

कलम ६(३) – तात्पुरत्या नियुक्त केलेल्या व्यक्तींना नियमाधीन करणे - मर्यादित मुदतीचा तात्पुरता कार्यकाळ - लोकसेवा आयोगाची संमती घेऊन नियमाधीन करण्यासाठी सरकारचे पाऊल - आयोगाद्वारे ते फेटाळणे गेले - निर्णय दिला की - कायद्याचे उल्लंघन करण्यासाठी कोणताही परमादेश किंवा निर्देश जारी केले जाऊ शकले नाहीत - उच्च न्यायालयाने योग्यरित्या, नियमांचे उल्लंघन न करता, सेवा नियमाधीन करणे बाबत कोणतेही आदेश जारी केले नाहीत.

दिवाणी अपीलीय न्यायाधिकरणः दिवाणी अपील क्र. ४४५/१९९७.

पाटणा उच्च न्यायालयाच्या सी.डब्लू.जे.सी क्र. ८५९७/१९९४ मधील एल.पी.ए. क्र. ७८८/९५ मधील ११.९.१९९६ रोजीच्या न्यायनिर्णय आणि आदेशावरून.

गोपाल सुब्रमण्यम, संतोष कुमार आणि आर. एन. केशवानी — अपीलकर्त्यांसाठी

न्यायालयाचा पुढील आदेश देण्यात आलाः

अनुमती देण्यात आली .

विशेष अनुमतीद्वारे केलेले हे अपील, पाटणा उच्च न्यायालयाच्या खंडपीठाच्या एल.पी.ए. क्र. ७८८/९५ मधील ११.९.११९६ च्या आदेशावरून उद्भवते.

मान्य असलेली स्थिती अशी आहे की १६ नोव्हेंबर १९८७ रोजी, अपीलकर्त्यांना सहाय्यक अभियंता म्हणून, दैनंदिन वेतनावर रु.४० प्रति दिवस ह्या दराने, नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर त्यांना प्रति महिना रु. ८८० - १५१० च्या वेतनमानात ठेवण्यात आले. त्यांची निवड परीक्षा घेऊन करण्यात आली आणि त्यानुसार नियुक्त्या करण्यात आल्या. प्रादेशिक विकास प्राधिकरणाच्या दुसऱ्या उत्तरवादीने सेवा नियमाधीन करण्याचा प्रयत्न केला आणि हा प्रस्ताव मान्यतेसाठी सरकारकडे पाठवण्यात आला. हा प्रस्ताव स्वीकारत सरकारने हे प्रकरण सार्वजनिक सेवा आयोगाकडे पाठवले होते. लोकसेवा आयोग त्यांच्या सेवा नियमाधीन करण्यास सहमत नसल्यामुळे, अपीलकर्त्यांनी, सेवा नियमाधीन करण्यासाठीचे निर्देश देण्याच्या पार्मादेशसाठी, उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली. आक्षेपीत आदेशात उच्च न्यायालयाने निर्देश देण्यास नकार दिला. म्हणून, विशेष अनुमतीद्वारे हे अपील.

श्री. गोपाल सुब्रमण्यम, अपीलकर्त्यांची बाजू मांडणारे विद्वान ज्येष्ठ वकील, ह्यांनी असा युक्तिवाद केला आहे की बिहार प्रादेशिक विकास प्राधिकरण कायदा, १९८१ (थोडक्यात, 'कायदा') चे कलम ६(३), प्राधिकरणाला, सचिव आणि प्राधिकरणाचे इतर अधिकारी आणि कर्मचारी नियुक्त करण्याचा अधिकार देते. त्याच्या परंतुकानुसार, नियुक्ती प्राधिकरणाला, राज्य सरकारच्या मान्यतेनंतर, कोणत्याही व्यक्तीला, कोणत्याही पदावर नियुक्त करण्याचा अधिकार आहे, ज्याचे किमान वेतन रु.५०० असेल, पण सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी नाही, आणि नियुक्ती जरी सहा महिन्यांसाठी असली तरी ती नियमित तत्वावर असेल. प्राधिकरणाने भरतीच्या पद्धतीसाठी कोणतेही संविधानिक नियम तयार केलेले नाहीत. जाहिरातीमध्ये या तात्पुरत्या नियुक्त्या असल्याचे सूचित केले गेले नाही. त्यामुळे, अपीलकर्त्यांना सेवेत नियमित होण्याचा हक्क आहे. आम्हाला युक्तीवादात कोणतेही बळ सापडत नाही.

कायद्याचे कलम ६(३) प्राधिकरणाला केवळ सचिव आणि प्राधिकरणाचे इतर अधिकारी आणि कर्मचारी नियुक्त करण्याचा अधिकार देते. परंतुकांतर्गत हा अधिकार म्हणजे तात्पुरत्या नियुक्त्या करण्यासाठी प्राधिकरणाला दिलेला केवळ पुरेसा अवकाश आहे, जेणेकरून विकास प्राधिकरणाचे काम, भरती प्रलंबित असेपर्यंत चालू राहील. म्हणून, जेव्हा भरतीसाठी जाहिरात देण्यात आली होती, तेव्हा ती स्पष्टपणे मर्यादित कालावधीसाठी परंतुकांतर्गतच्या अधिकाराच्या अभिवृधार्थ होती. त्यामुळे, नियुक्त्या केवळ तात्पुरत्या नियुक्त्या आहेत. नियुक्तीचा मर्यादित तात्पुरता कार्यकाळ लक्षात घेऊन अपीलकर्त्यांनी नियमाधीन करणेसाठी सरकारची मदत मागितली होती, जी लोकसेवा आयोगाने नाकारली होती. ही पदे लोकसेवा आयोगाच्या कक्षेत असल्याचे दिसून येते. त्यामुळे, सरकार ने लोकसेवा आयोगाची संमती मागितली आणि लोकसेवा आयोगाने सहमती दर्शवली नव्हती आणि आमच्या मते सरकारने केलेल्या विनंती प्रमाणे हे बरोबर आहे. त्यामुळे, लोकसेवा आयोगाने करावयाच्या भरतीचे उल्लंघन करणारे कोणतीही नियुक्ती नियमाधीन करणे हे कायद्याचे उल्लंघन आहे. त्यामुळे उच्च न्यायालयाने, नियमांचे उल्लंघन करून, केलेल्या सेवांना नियमाधीन करण्याचे कोणतेही आदेश जारी केले नाहीत आणि कायद्याचे उल्लंघन करण्यासाठी कोणतेही आदेश किंवा निर्देश जारी केले जाणार नाहीत.

त्यानुसार याचिका फेटाळली जाते. खर्चा बाबत आदेश नाही.

याचिका फेटाळण्यात आली.

## अस्वीकरण

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल".